पुण्य नगरी

# पोलीस, रवळनाथचा वॉक ऑन राईट

## शहरात जनजागृती फेरी

गडहिंग्लज : प्रतिनिधी

गडहिंग्लज पोलीस ठाणे, रवळनाथ हौसिंग फायनान्स आणि ज्ञानदीप प्रबोधिनीच्या वतीने शहरात वॉक ऑन राईट हा उपक्रम राबविण्यात आला. पोलीस निरीक्षक दिलीप घुगे व रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते या उपक्रमास प्रारंभ करण्यात आला.

उपक्रमांतर्गत शहरातील सकाळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांसह सर्वच पादचाऱ्यांना रस्त्याच्या उजव्या बाजूने चालण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



गडहिंग्लज : वॉक ऑन राईट उपक्रमात सहभागी झालेले पोलीस व रवळनाथचे कर्मचारी.

यावेळी पोलीस पथक व रवळनाथच्या कर्मचाऱ्यांनी फेरी काढून जनजागृती केली. एम. एल. चौगुले म्हणाले, सकाळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांची व पादचाऱ्यांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. यासाठी नांदेडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी वॉक ऑन राईट ही मोहीम राबवली.

शहरात जनजागृती मोहीम राबवण्याची आवश्यकता होती. यावेळी संजय चौगुले, महेश मजती, डी. के. मायदेव, बी. एस. पाटील, संदीप कागवाडे आदी उपस्थित होते.